# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित,

**CIN : 70200MH1998SGC116664**

५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१.

**संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा पुरवठा व रिफिलींग करण्यासाठी दरपत्रक मागविणेबाबत.**

## नोटीस

क्रमांक : शिपुप्रम/व्य(प्रशा)/ले.सा./ ४०१ /२०१७, दिनांक : ६ एप्रिल, २०१७.

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयास दि. ३० एप्रिल, २०१८ पर्यंत गरज भासेल त्याप्रमाणे, खाली नमूद केलेल्या विवरणपत्रातील विशिष्ट नमूद केलेल्या **मूळ कंपनीचेच** संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादी पुरविण्याकरीता व रिफिलींगसाठी सर्वात कमी दर पुढे नमूद केलेल्या विशिष्ट अटी व शर्तींच्या अधिनस्त सोबतच्या विहित अर्जाच्या नमुन्यात दि. १९ एप्रिल, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत.

### विवरणपत्र

संगणक विषयक टोनर/काट्रेजची यादी

| अ.क्र. | कंपनीचे नाव व क्रमांक | अंदाजे वार्षिक गरज * |
|---|---|---|
| I | II | III |
| १ | कॅनन टोनर ३०३ | ४ ते ७ |
| २ | ब्लॅक ८०२ (एचपी) | २ ते ५ |
| ३ | कलर ८०२ (एचपी) | २ ते ५ |
| ४ | एच.पी. काट्रेज ८८ A | ४ ते ७ |
| ५ | एच.पी. १२ अे | ९ ते १४ |
| ६ | एच.पी. १५१० | ४ ते ७ |
| ७ | सॅमसंग प्रिंटर M2876ND करीता ब्लॅक टोनर | ४ ते ७ |
| ८ | एच. पी. ६८० (कलर) | ७ ते १२ |
| ९ | एच.पी. ६८० (ब्लॅक) | ७ ते १२ |

*** टिप :** वरील विवरणापत्रातील रकाना III मध्ये दर्शविण्यात आलेली वार्षिक गरज ही अंदाजे संख्या आहे. प्रत्यक्षात कार्यालयाला गरज भासेल त्याप्रमाणे निवड एजन्सीला कळविण्यात येईल.

**सूचना :** दरामध्ये, तसेच दरपत्रकाच्या कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. तथापि, अपरिहार्य कारणास्तव, तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक/शिपुप्रम यांच्याकडे राखून ठेवले आहेत.

**संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादी पुरविण्याकरीता व रिफिलींग करण्यासाठी विहित करण्यात आलेल्या अटी/शर्ती आणि निवडीचे निकष व पध्दत खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत.**

**<u>अटी, शर्ती, निवडीचे निकष व पध्दत :</u>**

१. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या (शिपुप्रम) संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादी पुरविण्याकरीता व रिफिलींगसाठी निविदा सादर करणाऱ्या एजन्सीने संपूर्ण माहिती नमूद करुन तसेच अटी व शर्ती मान्य असल्याबद्दल सोबतच्या विहित नमुन्यातील अर्ज/दरपत्रकात स्वत: पुरवठादाराने नावासह सही करणे आवश्यक आहे.

२. पुरवठादाराने दरपत्रकानुसार विहित वेळेत संगणक विषयक टोनर/काट्रेंज इत्यादीचा पुरवठा करणे व रिफिलींग करुन देणे बंधनकारक असल्याचे सोबतच्या विहित नमुन्यातील दर अर्ज/पत्रकात स्वाक्षरीसह नमूद करणे, बंधनकारक आहे.

३. संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादी शक्य असेल त्या मर्यादेपर्यंत ब्रॅन्डेड (Branded)/भारतीय मानक ब्यूरो (ISI) दर्जाच्या साहित्य/सामुग्रीच्या स्पर्धात्मक दरांची तुलना करुन, विविध दरपत्रकातील केवळ सर्वात कमी दर आढळणाऱ्या संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचे तसेच रिफिलींगचे त्या-त्या विशिष्ट पुरवठादाराचे दर सर्वसाधारणपणे स्विकारण्यात येतील.

४. केवळ आस्थापना/दुकाने अधिनियम लायसन्स, वॅट, सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र व आयकर क्रमांक /पॅनकार्ड धारक पुरवठादारानेच दर सादर करावेत. सदरहू सर्व परवाने वॅट, सेवाकर प्रमाणपत्र व पॅनकार्डची स्वयं-साक्षांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्या पुरवठादाराचे दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही, व ते दरपत्रक अनर्ह (disqualified) समजण्यात येईल. दरपत्रकावर स्वत: पुरवठादाराची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे. अन्य व्यक्तींनी सही केलेले दरपत्रक ग्राह्य समजले जाणार नाही व ते विचारात घेतले जाणार नाही.

५. दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे सर्व करांसहीत नमूद केलेले असावेत.

६. दरपत्रकामध्ये नमूद करण्यात आलेले दर स्विकारण्यात आल्यास ते दर, कराराच्या दिनांकापासून पुढील १ वर्षाच्या कालावधी पर्यंत अस्तित्वात राहतील. सदरहू १ वर्षाच्या कालावधीमध्ये संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींच्या व रिफिलींगच्या दरामध्ये कोणत्याही कारणामुळे दरवाढ झाली तरी पुरवठादारास दरपत्रकात सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही प्रकारे दरवाढ देण्यात येणार नाही.

७. पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर मागणी केलेल्या संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा पुरवठा मागणीनुसार (त्या विशिष्ट कंपनीचा) तात्काळ करणे तसेच वेळोवेळी रिफिलींग करुन देणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

८. उपरोक्त १ वर्षाचा करार संपल्यावर पुढील दर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, तथापि जास्तीत-जास्त १ महिन्यापर्यंत पुरवठादाराला त्यांनी मान्य केलेल्या दराने संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा पुरवठा करणे व रिफिलींग करणे बंधनकारक राहील.

९. शिपुप्रमने दर स्विकृत केल्यावर त्या संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादीची गरज भासल्यास त्या वस्तूंची रितसर पत्राद्वारे मागणी कळविण्यात येईल व केवळ त्या व तितक्याच वस्तूंचा पुरवठा करणे आवश्यक राहील. तसेच रिफिलींगची आवश्यकता भासल्यास रितसर पत्राद्वारे कळविण्यात येईल व सदर टोनर/काट्रेज रिफिलींग करुन देणे आवश्यक राहील.